आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० मार्च २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- देशभरातल्या २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत केरोसीनचं वितरण करायला केंद्र सरकारची परवानगी

- येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात

- भारताची तिरंदाज शीतलदेवीला २०२५ या वर्षाचा ‘पॅराआर्चर ऑफ द ईयर’ पुरस्कार जाहीर

**आणि**

- राज्यात आजही काही ठिकाणी गारपिटीसह अवकाळी पावसाची हजेरी, पुढचे पाच दिवस पाऊस आणि वादळाची शक्यता

<><><><><>

देशभरातल्या २१ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत उच्च दर्जाच्या केरोसीनचं वितरण करण्याची परवानगी केंद्र सरकारनं दिली आहे. युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यावर काही प्रमाणात तोडगा काढण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं सरकारनं काढलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

हे केरोसीन फक्त घरगुती इंधन आणि दिवाबत्तीच्या वापरासाठी असून ज्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सर्वसाधारणपणे केरोसीन उपलब्ध नव्हतं तिथंही ते आता उपलब्ध केलं जात आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात सरकारी तेल कंपन्यांच्या दोन वितरण केंद्रांवर मिळून ५ हजार लिटर केरोसीन उपलब्ध करून दिलं जाणार आहे. त्वरित वितरण व्हावं यासाठी वितरकांना काही परवान्यामधून सूट दिली जाईल. हा शासननिर्णय त्वरित प्रभावानं अमलात येणार असून पुढच्या दोन महिन्यांसाठी तो लागू राहील.

<><><><><>

भारताचा ध्वज असलेल्या आणखी दोन LPG वाहक जहाजांनी ***होर्मुझ*** ची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे. या जहाजांमध्ये सुमारे ९४ हजार टन LPG आहे. 'BW TYR' आणि 'BW ELM' ही दोन LPG वाहक जहाजं येत्या दोन दिवसांत भारताच्या किनाऱ्यावर

पोहोचतील, असा अंदाज आहे. 'BW TYR' हे जहाज उद्या मुंबईत तर 'BW ELM' हे जहाज येत्या १ एप्रिलला 'न्यू मंगलोर' मध्ये पोहोचेल असा अंदाज आहे.

<><><><><>

येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. देशातली ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असणार आहे. देशाचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी आज दिल्लीत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

या प्रक्रियेअंतर्गत १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीदरम्यानच्या ३० दिवसांच्या कालावधीत राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांकडून घरांची यादी तयार करण्याचं काम केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

यंदाच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत पहिल्यांदाच स्वयंगणनेची सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे, याअंतर्गत घरांची यादी करण्याचं काम सुरू होण्यापूर्वीच्या १५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांना ही सुविधा वापरता येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वयंगणनेसाठीचं पोर्टल १६ भाषांमध्ये उपलब्ध करून दिलं आहे अशी माहितीही त्यांनी दिली.

जनगणनेसाठीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रश्नांची अधिसूचना आधीच जारी केली आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठीचे प्रश्न लवकरच प्रसिद्ध केले जातील. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातिनिहाय गणना केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

सध्याच्या बदलत्या परिस्थितीत शेतकरी उत्पादक असण्यासोबतच उत्तम उद्योजकही बनावा यासाठी पणन विभागाच्या वतीनं आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या राज्यस्तरीय परिषदेचं उद्घाटन रावल यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. शेतकऱ्यांनी शेतीमालाच्या विपणन, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री अशा सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे असं ते म्हणाले. विद्यमान बाजार व्यवस्थेपेक्षा जास्त आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याच्याच्या उद्देशानं वाढवण बंदर परिसरात सुमारे १२०० एकरवर, अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचं नियोजन केलं

जात असल्याचं त्यांनी सांगितलं. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, यामुळे राज्यासह देशभरातल्या शेतमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयाला येईल असं ते म्हणाले.

<><><><><>

भारताच्या शीतलदेवीला २०२५ या वर्षाचा 'पॅराआर्चर ऑफ द ईयर' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तिरंदाजीत २०२५मध्ये अव्वल दर्जाची कामगिरी करणाऱ्या तिरंदाजांना जागतिक तिरंदाजी एक्झिक्युटिव बोर्डाने पुरस्कार जाहीर केले, यामध्ये जम्मू काश्मीरच्या शीतलदेवीचा समावेश आहे. जन्मपासून दोन्ही हात नसल्यामुळे पायाने तिरंदाजी करणाऱ्या शीतलदेवीने गेल्यावर्षीच्या ग्वांगजू इथल्या पॅरातिरंदाजी चषक स्पर्धेत वैय्यक्तिक सुवर्णपदक पटकावलं होतं. त्याचबरोबर महिलांच्या सांघिक स्पर्धेत रौप्य आणि मिश्र सांघिकमध्येही कांस्य पदक पटकावलं होतं.

<><><><><>

राज्याच्या काही भागात आज अवकाळी पावसानं हजेरी लावली. काही ठिकाणी गारपीटही झाल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

नाशिक शहरात सलग दुसऱ्या दिवशी काही भागात अवकाळी पावसानं हजेरी लावली. बागलाण आणि मालेगाव तालुक्यात अनेक ठिकाणी हलक्या सरी कोसळल्या. नाशिक शहरातही ढगाळ वातावरण कायम आहे. काल सिन्नर आणि येवला तालुक्यात काही भागात पावसाबरोबराच गारपीटही झाली. त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे..

धुळे शहर आणि जिल्ह्यात आज दुपारी जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. धुळे, शिरपूर, साक्री आणि शिंदखेडा तालुक्यांच्या ग्रामीण भागात वादळ आणि पावसामुळे काही ठिकाणी झाडे कोसळली, विजेच्या तारा तुटून वीज पुरवठा खंडित झाला. या पावसामुळे शेतीला मोठा फटका बसला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात शनिमांडळ आणि परिसरातल्या गावांना गारपीटीसह अवकाळी पावसानं झोडपलं. या पावसाने या परिसरातील कांद्यासह अन्य पीकांना फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बीड शहरात आज दुपारी जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. जिल्ह्यात इतर काही ठिकाणीही पावसानं हजेरी लावली.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आणि मूलभूत संरचना या जागतिक अस्थिरतेच्या काळातही मजबूत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होत्या. जगभरातल्या सर्वच देशांचं चलन या युद्ध परिस्थितीमुळे प्रभावित झालं असून डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होण्यामागचं कारणदेखील हेच असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातली महागाई कमी झाली आहे, जीडीपी ७ टक्क्याहून अधिक दराने वाढत आहे, आणि चालू खात्यातली तूट १ टक्क्याहून कमी आहे, असं त्यांनी सांगितलं. देशाची सर्वांगीण प्रगती होत असताना त्याकडे दुर्लक्ष करून केवळ रुपयातली घसरण अधोरेखित करण्याचं विरोधी पक्षांचं धोरण चुकीचं असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

देशातून नक्षलवादी हिंसाचार संपवण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांबद्दल लोकसभेत चर्चेत सहभागी होताना शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी आधीच्या काँग्रेसप्रणित सरकारवर टीका केली. पूर्वीची लाल मार्गिका आता विकास मार्गिका झाली आहे असं शिंदे म्हणाले. पूर्वी २०० जिल्ह्यांमध्ये फोफावलेला नक्षलवाद आता फक्त ३ जिल्ह्यांपुरता उरला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सर्व राज्यांना व्यावसायिक एलपीजीच वितरण योग्य प्रमाणात व्हावं यासाठी तेल वितरण कंपन्यांनी कार्यकारी संचालक पातळीच्या अधिकाऱ्यांची एक त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. सरकारने राज्यांना करण्यात येणाऱ्या व्यावसायिक एलपीजीच्या वितरणात २० टक्के वाढ केली असून आता ते प्रमाण युद्धाच्या आधीच्या वितरणाच्या ७० टक्क्यांपर्यंत गेलं आहे. भारत त्याच्या वापराच्या ६० टक्के एलपीजी आयात करतो आणि त्यातला ९० टक्के एलपीजी होर्मूझच्या सामुद्रधुनीतून आणला जात होता. एलपीजी पुरवठा अधिक सुरळीत करण्यासाठी सरकार अनेक बाजूंनी प्रयत्न करत असल्याचं गोपी यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

भाजपा खासदार निशीकांत दुबे यांनी मराठी माणसासंदर्भात केलेल्या वक्तव्याप्रकरणी नाशिकच्या न्यायालयानं त्यांना नोटिस बजावली आहे. त्यानुसार पुढच्या सुनावणीला ७ एप्रिल रोजी त्यांना हजर राहावं लागणार आहे.

<><><><>

सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीकाठावर १२ नवीन घाट उभारले जात आहेत. नाशिक महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ आणि जलसंपदा विभाग यांच्या माध्यमातून ही कामं सुरू असून, कुंभमेळ्यापूर्वी ती पूर्ण करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखरसिंह यांनी दिली.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यात अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटवर नियंत्रक शिधावाटप आणि संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या दक्षता पथकाने छापा टाकला. या कारवाईत ९१ घरगुती सिलिंडर, ७५ रिकामे गॅस सिलिंडर, १९ किलो आणि ५ किलो चे व्यावसायिक सिलिंडर, ३ हाय-प्रेशर ट्रिपलेक्स पावर पंप, रिफिलिंगसाठी लागणारे २ मोटार पंप, ६ इलेक्ट्रॉनिक वजन काटे, असा साडे तीन लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचा मुद्दे माल जप्त करण्यात आला आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेटमधे आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे.

थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

राज्याच्या काही भागांमध्ये येत्या पाच दिवसांत पाऊस आणि वादळाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. मुंबईसह पुणे, नाशिक, जळगाव, सोलापूर, अहिल्यानगर हे जिल्हे तसंच मराठवाड्याला वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट विभागाने दिला आहे. पाऊस आणि वादळी हवामानाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तयार झालेल्या

पिकांचं रक्षण करायच्या तर नागरिकांना वादळी पावसाच्या दरम्यान काळजी घेण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत.

//<><><><><>//